# गांधीवाद आणि मराठी साहित्य प्रवाह एक अभ्यास

**डॉ. रेखा काशिनाथ पसाले,** सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख , आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, कासेगाव.

---

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यामध्ये १९२० ते १९४७ पर्यंत मराठी साहित्य हे समाज वास्तवापासून दूर असलेला दिसत असून यामध्ये पोकळ मनोरंजन करणे, सुधारणावादाचा, सुखवादाचा आणि विवेकनिष्ठेचा आव आणण्यातच साहित्यिक जास्त होते. त्यामुळे समाजातील संघर्षाचे प्रतिबिंब मांडण्याकडे साहित्यकांचा कल नव्हता. १९६० पर्यंत समाजाभिमुख लेखनाकडे साहित्यिक गांभीर्याने पहाताना दिसत नाहीत. अगदीच मोजके लेखन समाज वास्तवाचे भान आणणारे होते. स्वातंत्र्यप्राप्तीनतर सामाजिक व राजकीय परिस्थितीत आमूलाग्र परिवर्तत झाले याचा परिणाम साहित्य क्षेत्रावरही झाला. समाजजीवनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटू लागले.दलित- ग्रामीण या प्रवाहाबरोबरच स्त्रीही जागी झाली आणि आपल्या स्वतःच्या वेदना साहित्यातून मांडू लागली. आदिवासी जनवादी, भटके-विमुक्त असे समाजही व्यक्त करू लागले. यातूनच मराठी साहित्यामध्ये विविध वाडमयीन प्रवाह निर्माण झालेले आहेत. यामध्ये चळवळीची भूमिका महत्वाची आहे. यातील एक परिवर्तनात्मक चळवळ गांधीजीची होती. जी विश्वव्यापक विचारला बळ देणारा आहे. त्यांच्या विचारात लोकांच्या हातातील संपत्ती, असुरक्षितता, बेकारी, दारिद्य, शेतकऱ्यांचे प्रश्न, शहरीकरण, उदासीन शासनव्यवस्था या विषयीची मांडणी असून यातूनच साहित्याची निर्मिती झाली.

**उद्देश :** १.गांधीवादी विचारातून साहित्यनिर्मिती प्रेरणाचा अभ्यास करणे.

२. गांधीजीच्या विचाराची साहित्यक कृतीचा अभ्यास करणे

**विषयप्रवेश :**

महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्य लढ्याबरोबरच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी पातळीवर दाखविलेला मार्ग समाजाला अधिक प्रभावी वाटत होता. उदा. नैतिकता, दीनदुबळ्यांचे कल्याण, दरिद्री आणि पददलितांच्या उन्नतीचा मार्ग, कृती आणि उक्ती यातील प्रामाणिकपणा, निर्भयता, देशासाठी सर्वस्वाचा त्याग, सत्य, अहिंसा, अपरिग्रह, सत्याग्रह, स्वदेशी, मूलोद्योगी शिक्षण इत्यादी गोष्टींचा प्रभाव भारतीय समाजावर फार मोठ्या प्रमाणात पडला होता. त्यातूनच गांधीवाद तत्व विकसित झाले. गांधीवादी तत्त्वज्ञान हे केवळ राजकीय, नैतिक आणि धार्मिक नाही तर पारंपारिक आणि आधुनिक आणि साधे आणि गुंतागुंतीचे आहे. हे अनेक पाश्चात्य प्रभावांना मूर्त रूप देते ज्यांना गांधींनी तोंड दिले होते, परंतु ते प्राचीन भारतीय संस्कृतीत रुजलेले आहे आणि वैश्विक नैतिक आणि धार्मिक तत्त्वांचे पालन करते. त्यांच्या प्रत्येक विचारात जन कल्याणाचा आशय असतो. त्यांच्या या विचाराचा महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रातील प्रभाव पडला आहे. त्यांच्या विचारात ग्रामीण जनता, अस्पृश्य लोक, आदिवासी स्त्रिया यांची मध्यवर्ती भूमिका असून यांच्या विकासासाठी त्यांनी आपल्या धोरणांचा विकास केला. गांधीजींच्या कार्याचा चांगलाच परिणाम झाला. ग्रामोद्योगांच्या उपक्रमामुळे ग्रामीण माणसाला गांधीजींच्याविषयी आदर वाटू लागला. आधुनिकता सांभाळून स्वतःची परंपरा व देशीपणा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न झाला. या साऱ्यांचा प्रभाव तत्कालीन व त्यानंरही काव्य, नाटक, कथा, काटंबरी इत्यादी साहित्य क्षेत्रावर पडल्याचे दिसते. यातून नवीन कांदबरी, नाटके विकसित झाली. भारतीय तळागाळातील समाज गांधीजींच्या या मार्गाकडे कौतुकाने पाहत होता. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर लोकमान्यांचे अनुयायीही या गांधीजींच्या मार्गाने येऊ लागले. गांधी दर्शनचा हा मुख्य सिद्धान्त आहे. सत्य, अहिंसा व न्यायाचा आधार आध्यात्मिक ज्ञान आणि प्रेरणा आहे.गांधीजींनी भक्तिमार्ग, कर्मयोग यांचा समन्वय साधून रामराज्य स्थापण्याचा सत्याग्रही मार्ग समाजाला दाखविला. यातून गांधी वादी विचारप्रणाली विकसित झाली.

गांधीवाद ही एक आध्यात्मिक विचारप्रणाली आहे. गांधीजींच्या अनुयायांनी गांधीवाद आपल्या भाषणातून, कृतीतून, साहित्यातून जनमानसांसमोर आणला. भारतातील प्राचीन ग्रंथ रामायण, लोककला, लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकजीवन इत्यादी समाजापर्यंत पोहचवण्याचे कार्य केले. गांधीजींच्या अनुयायांनी

मराठी साहित्यामध्ये वैचारिक साहित्याचे लेखन करून मराठी साहित्य अधिक सजग केले आहे. मराठी साहित्याला संस्कार करण्याचे कार्य अनुयायांच्या साहित्याने केले आहेत. गांधीजींच्या अनुयायांमध्ये आचार्य विनोबा भावे, आचार्य शं. द. जावडेकर, आचार्य स. ज. भागवत, आचार्य काका कालेलकर, साने गुरुजी, ग. प्र. प्रधान, एस. एम. जोशी, आप्पासाहेब पटवर्धन, ना. ग. गोरे इत्यादी अनेक अनुयायी गांधीजींचे कार्य सर्व अंगांनी पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करत होते. अशा साहित्यिकांवर गांधीजींच्या कार्याचा, विचारांचा प्रभाव पडला होता. त्यामध्ये आचार्य विनोबा भावे, आचार्य शं. ट. जावडेकर, आचार्य स.ज. भागवत, साने गुरुजी, बाबा आमटे, काका कालेलकर, प्रेमा कटक, अच्युतराव पटवर्धन, ना. ग. गोरे, एस.एम. जोशी, ग. प्र. प्रधान, रा. वि. परूळेकर इत्यादी अनुयायांच्या मराठी साहित्यावर गांधीवादाचा प्रभाव पडला आहे. विनोबा भावे गांधीजींच्या विचाराने प्रभावित होते. त्यांच्या ''विनोबांचे इतिहास विचार' या ग्रंथामध्ये विनोबांच्या विचारसरणीत महात्मा गांधीजींच्या विचारांचा किती प्रभाव होता याची कल्पना येते. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव कमी जास्त प्रमाणात द. र. कवठेकर यांच्या साहित्यात दिसतो. सत्य, अहिंसा व भूतदया या वृत्तीचा पुरस्कार त्यांनी आपल्या साहित्यामध्ये केला.

वामन चोरघडे यांचा जन्म हा गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळी सुरु होत्या त्या कालखंडातील आहे. त्यामुळे त्यांच्यावर महात्मा गांधीजींचा प्रभाव होता. त्यांच्या अनेक कथांतून गांधीजींच्या विचारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्या कथेमध्ये तत्कालीन राजकीय जीवनाचे प्रतिबिब उमटलेले आहे. वामन चोरघडे ग्रामीण कथाकार म्हणून सुपरिचित आहेत. ग्रामीण जीवनाचे विशेष आकर्षण वामनरावांना वाटते. त्यांचा जन्म खेड्यात झाला. त्यांचे बालपण गोंड, गोवारी, कुणबी यांच्या मुलाबरोबर खेळण्यात गेले. त्यांच्यावर खेड्याचे संस्कार झाले आहेत. त्यांच्या स्मृती खेड्याच्या परिसरातील आहेत. वामनरावांची ग्रामीण कथा अदभुततेकडे जाणारी कथा खेड्यातील जीवनाबद्दल, खेड्यातील सौंदर्य, मांगल्य, संस्कार इत्यादींचे वास्तवपूर्ण दर्शन घडविते.

वि. द. घाटे यांनी ग्रामीण जीवन अनुभवले होते. त्यामुळे त्यांच्या साहित्यात ती वास्तवता दिसते. वि. द. घाटे यांनी ग्रामीण सुधारणाविषयीचे विचार मांडले आहेत. त्यांच्यावर गांधींचा प्रभाव कथांतून दिसून येतो. तर महात्मा गांधीजींनी खेड्यातील लोकांचे जीवन उन्नत होण्यासाठी खेड्यातील माणसांना शिक्षण मिळाले पाहिजे. खेड्यांचे परिवर्तन झाले पाहिजे अशी आग्रहाची भूमिका शकर पाटील यांच्या कथांमध्ये दिसतो.

अशा प्रकारे मराठी साहित्य क्षेत्रामध्ये १९२० पासून गांधीयुग सुरू झाले. गांधीजींनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी व समाजातील सामाजिक परिवर्तनासाठी भारतीय समाजाला सत्य, अहिंसा, अपरिग्रह, नैतिकता, मानवता, रामराज्य संकल्पना, विश्वस्त संकल्पना, स्वदेशी संकल्पना अशा विचारांचा प्रसार केला. हा विचार ग्रामीण भागातील खेड्यापर्यंत पोहचला. या विचारांचा परिणाम साहित्यिकांवर होऊ लागला. साहित्यिकांनी आपल्या अनुभव विश्वाप्रमाणे आपले जीवनवास्तव साहित्यामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला. त्यातून मराठी साहित्य अवतरू लागले. त्यातील आशय आविष्कार यामध्ये कमालीचा फरक पडला. साहित्यामध्ये नवीन विषय अवतरू लागले. मराठी साहित्य दालन अशाप्रकारे आविष्कृत होऊ लागले.

**संदर्भ :**

१.संपादक वास्कर आनंद , 'वाडमय प्रकार संकल्पना व स्वरूप ', अन्वय प्रकाशन, पुणे,२००४

२.पुंडे दत्तात्रय , 'गांधीवाड आणि आधुनिक मराठी साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे,१९९५

३.जगताप अनंतराव , 'इथे मराठीचिये नगरी' गम्धिजी, उषा ज्योती प्रकाशन, औरंगाबाद, १९७०

४.चव्हाण एस.एस., 'गांधीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव', पीएच.डी. अप्रकाशित शोधप्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विधीपीठ, पुणे२०२१